ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) वर्ष : दुसरे अंक : २२० वा दिनांक : २७/०६/२०२५ वार : शुक्रवार

## हिंदी सक्तीचे धोरण उद्धव ठाकरेंच्या कार्यकाळात स्वीकारले होते : मंत्री उदय सामंत



**मुंबई :** राज्यात शालेय शिक्षणात हिंदी भाषा सक्तीचे धोरण महाविकास आघाडी सरकारच्या काळात उद्धव ठाकरे मुख्यमंत्री असताना स्वीकारले होते, असा दावा राज्याचे उद्योगमंत्री उदय सामंत यांनी केला आहे. तसेच आदित्य ठाकरे यांनी देखील याची पाठराखण केली होती. मात्र, आता हिंदी सक्ती नसताना ठाकरे गटाकडून जाणीवपूर्वक हिंदी भाषेवरून राजकारण केले जात आहे, अशी टीका सामंत यांनी केली आहे.

उदय सामंत म्हणाले, डॉ. माशेलकर समितीने इयत्ता पहिली ते बारावीपर्यंत मराठी, इंग्रजी आणि हिंदी या तीन भाषा सक्तीने शिकवल्या पाहिजेत, असा प्रस्ताव ठाकरे यांनीच कॅबिनेटमध्ये स्वीकारला होता. परंतु आता सक्ती नसतानाही ठाकरे गटाकडून राजकारण केले जात आहे. हिंदीची सक्ती कुठेही करायची नाही आणि हिंदी अनिवार्य करायची नाही ही शासनाची भूमिका आहे. मात्र महापालिका निवडणूक जवळ आल्याने काहीजण या मुद्द्याचे राजकारण करत आहेत.

पुढे बोलताना उदय सामंत म्हणाले, राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या अंमलबजावणी करण्यासाठी एक कार्यगट स्थापन केला होता. ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. रघुनाथ माशेलकर यांच्या अध्यक्षतेखालील नेमलेल्या या समितीने इयत्ता पहिले ते बारावीपर्यंत मराठी, इंग्रजी आणि हिंदी या तीन भाषा शिकवल्या गेल्या पाहिजेत, असा अहवाल सरकारला सादर केला होता. तो अहवाल २७ जानेवारी २०२२ रोजी तत्कालीन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी कॅबिनेटमध्ये स्वीकारला होता, असा गौप्यस्फोट समंतांनी केला आहे.

राज्यात शैक्षणिक धोरण २०२० च्या धोरणानुसार बारावीपर्यंत हिंदी सक्तीबाबत ठाकरे गटाने हरकत का घेतली नाही, असा सवाल करताना, ज्यांच्या मुख्यमंत्रीपदाच्या काळात राज्यात हिंदी सक्ती लागू झाली, तेच आता हिंदी भाषेबाबत मोर्चे काढत आहेत, ही दुटप्पी भूमिका आहे. महापालिकेच्या निवडणुका जवळ आल्याने काहीजण भावनिक साद घालून मराठी आणि हिंदी भाषेवरून राजकारण करत आहेत, अशी टीका उदय सामंत यांनी केली.

मराठी भाषेबरोबरच जेवढ्या जास्त भाषा येतील तेवढे चांगले असे मत ठाकरे गटाचे आमदार आदित्य ठाकरे यांनी एका पत्रकार परिषदेत व्यक्त केले होते. सिंगापूरमध्ये मातृभाषेबरोबरच इंग्रजी शिकवले गेले त्यामुळे त्यांची प्रगती झाली. देशात यूपीएसी ही सर्वात कठीण परीक्षा आहे, मात्र तिथून पास होणाऱ्या अधिकाऱ्यांना इंग्रजी, हिंदी आणि मातृभाषेमध्ये संवाद साधावा लागतो, असे म्हणत आदित्य ठाकरे यांनी एकप्रकारे हिंदी भाषेची पाठराखण केली होती, असेही उदय सामंत यांनी म्हटले आहे.

मुंबईत मराठी भाषा केंद्र साकारले जाणार आहे. यासाठी १०० कोटी खर्च केले जाणार आहे. मराठी भाषेचे उपकेंद्र ऐरोलीमध्ये होणार आहे, अशी माहिती उदय सामंत यांनी दिली आहे. विश्व मराठी संमेलन, मराठी साहित्याच्याबाबत महिलांसाठी, युवकांसाठी साहित्य संमेलन, बाल साहित्य संमेलन सरकारकडून केली जातात. मराठी ही मातृभाषा आणि ती प्रत्येकालाच आली पाहिजे, ही शासनाची भूमिका आहे, असे मंत्री सामंत म्हणाले. तसेच मराठी साहित्यिकांची भूमिका समजून घेण्याबाबत त्यांच्याशी चर्चा करण्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी निर्देश दिले आहेत. त्यानुसार पुढील आठवड्यात साहित्यिकांची बैठक घेणार आहे. राज ठाकरे यांच्या मोर्च्याविषयी भूमिका मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री घेतील. मराठी भाषा मंत्री म्हणून वेळ पडल्यास राज ठाकरे यांची भेट घेऊ, असे मंत्री सामंत यांनी स्पष्ट केले.




## महापालिकेच्या निवडणुकांसाठी इतर पक्षांची आज गरज भासत नाही : खासदार सुनील तटकरे



**रायगड :** महाराष्ट्रात आता स्थानिक स्वराज्य संस्थानच्या निवडणुका होणार आहेत. या पार्श्वभूमीवर सर्वच राजकीय पक्षांनी जोरदार तयारी सुरू केली आहे. आगामी महापालिका निवडणुका जवळ आलेल्या असताना देखील नाशिक आणि रायगड येथील पालकमंत्री पदाचा तिढा अद्याप सुटलेला नाही. या सगळ्यावर राष्ट्रवादी कॉंग्रेस अजित पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष व खासदार सुनील तटकरे यांनी भाष्य केले आहे.

रायगड येथे शिंदे गटासोबत बिनसल्यावर राष्ट्रवादी कॉंग्रेस शेतकरी कामगार पक्षासोबत हातमिळवणी करणार का असा प्रश्न सुनील तटकरे यांना विचारण्यात आला होता. यावर बोलताना तटकरे म्हणाले, मला इतर पक्षांची गरज आज संभावत नाही. शेकाप आणि त्यांच्या पक्षातील कोणत्याच नेत्याशी संवाद देखील नासल्याचे त्यांनी म्हटले आहे. तसेच आगामी काळातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका करताना युतीमध्ये सामंजस्य कसे राहील. तसेच या निवडणुका एकोप्याने कशा लढता येतील या संदर्भातील चर्चा झाल्याची माहिती सुनील तटकरे यांनी दिली आहे. परंतु यावेळी बोलताना रायगडमधील राजकीय परिस्थितीवर भाष्य करणे त्यांनी टाळले आहे.

सध्या शिवसेना ठाकरे गटाचे नेते भास्कर जाधव चर्चेत आहेत. त्यांनी शरद पवारांची साथ सोडली हे चुकल्याचे म्हटले होते. यावर प्रतिक्रिया देताना सुनील तटकरे म्हणाले, भास्कर जाधव यांचे हे विधान मागच्या मुलाखतीत सुद्धा केले होते. जाधव हे राज्यातील प्रमुख आणि ज्येष्ठ नेते आहेत. भास्कर जाधव यांनी त्यांचे कर्तुत्व, दांडगा जनसंपर्क आणि संघटन कौशल्य यामुळे उंची गाठली आहे. त्यांनी केलेले विधान हे त्यांच्या राजकीय अनुभवावरून असू शकते, असे मत सुनील तटकरे यांनी व्यक्त केले आहे.

महाराष्ट्रातील कोल्हापूर, धाराशिव आणि सोलापूर या जिल्ह्यातून शक्तिपीठ महामार्गाला मोठ्या प्रमाणात विरोध होत आहे. यावर बोलताना सुनील तटकरे म्हणाले, राज्यात अनेक पायाभूत सुविधा निर्माण करण्याचे काम पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली महायुती करत आहे. त्यामुळे अटल सेतू, हार्बर लिंक, कोस्टल हायवे, मुंबई पुणे हायवे, वसई विरार कॉरिडॉर, समृद्धी महामार्ग असे मोठे प्रोजेक्ट करत असताना सरकारला कर्ज घ्यावेच लागते. त्यामुळे शक्तिपीठ महामार्गाला जरी कोल्हापूर आणि सांगली मधील शेतकऱ्यांचा विरोध असेल तरी त्याबाबत समन्वयाची भूमिका राज्य शासन घेईल.

लाडकी बहीण योजनेमुळे इतर विभागांना निधी पुरवला जात नसल्याची टीका विरोधकांकडून केली जात होती. यावर बोलताना सुनील तटकरे म्हणाले, निर्धारित वेळेत त्या त्या विभागाला निधी मिळेल. ३० जूनला होणाऱ्या अधिवेशनात याबाबतीत तिढा सोडविण्यात येईल. तसेच कर्जबामाफी, विद्युत माफीवर वित्त विभाग कधीच मान्यता देऊ शकत नाही. मात्र लोकांचे सरकार हे लोकांसाठी काम करत असल्यामुळे वित्त विभागाने असे मत व्यक्त केल्याचे तटकरे म्हणाले.

हिंदी सक्तीच्या निर्णयामुळे राज्यात एकच खळबळ उडाली आहे. यामुळे सरकारलाही मोठ्या प्रमाणात विरोधाचा सामना करावा लागत आहे. यावर सुनील तटकरे म्हणाले, तिसरी भाषेचा पर्याय ठेवणे हे आमचे मत आहे. आपली मराठी मातृभाषा आहेच आपल्याला भाषेचा अभिजात दर्जा मिळाला हे सुद्धा अत्यंत आनंदाचे. परंतु आपल्याला राष्ट्रीय स्तरावर जायचे असेल तर हिंदी भाषा किंवा पर्याय भाषा काळाची गरज आहे. परंतु पहिलीपासून हिंदी सक्ती करणे हे योग्य राहणार नाही. उद्याच्या काळात येणाऱ्या मुलांना हिंदी अवगत होणे गरजेचे आहे. ही करत असताना मराठी भाषेवर अन्याय होणार नाही, असे तटकरे म्हणाले.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार २७ जून २०२५

## श्रीमती दानकुँवर महिला महाविद्यालयात 'गुरू पाठीराखा' आषाढ वारी दिंडी माहिती पटाचे प्रदर्शन उत्साहात संपन्न




**जालना :** सध्या महाराष्ट्रभर लोकांना पंढरीच्या विठ्ठलाच्या भेटीची ओढ लागलेली आहे. समाजाच्या सर्व स्तरातून पांढरपुरला जाणाऱ्या आषाढ वारी दिंडीने महाराष्ट्र दुमदुमला आहे. या वारीनेच महाराष्ट्राचा सांस्कृतिक ठेवा जपलेला आहे. असे प्रतिपादन सुप्रसिद्ध कवी श्रीधर नांदेडकर यांनी केले.

येथील श्रीमती दानकुँवर महिला महाविद्यालयातील मराठी भाषा व वाङ्मय विभाग आणि मराठी विभाग जेईएस महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने वारकरी धर्मसंकीर्तन सेवा प्रतिष्ठान, कुंभारझरी तालुका जाफराबाद येथील पायी वारी दिंडी सोहळा महाविद्यालयात विश्रांतीसाठी थांबलेला होता. यानिमित्ताने गुरू पाठीराखा आषाढ वारी दिंडी माहितीपट प्रदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.या कार्यक्रमाचे अध्यक्ष संस्थेचे अध्यक्ष श्री. महेंद्रकुमार गुप्ता तर प्रमुख अतिथी म्हणून जेष्ठ साहित्यिक बसवराज कोरे, प्रमुख मार्गदर्शक म्हणून लेखक,कवी,पत्रकार विनोद जैतमहाल व सुप्रसिद्ध कवी श्रीधर नांदेडकर होते.

यावेळी फिल्म एडिटर अभिजित चव्हाण, संस्थेचे कोषाध्यक्ष संजय अग्रवाल, संचालक विनोद अग्रवाल, दिंडी मार्गदर्शक हभप सोनुने गुरुजी, जेईएस महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.गणेश अग्निहोत्री, प्राचार्य डॉ.एस.डी.तळेकर आदींची प्रमुख उपस्थिती होती.पुढे बोलताना नांदेडकर म्हणाले की, महाराष्ट्राच्या संस्कृतीचा ठेवा एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे हस्तांतरित करण्याचे काम पंढरीच्या वारीने मागील शेकडो वर्ष केले आहे. काळाच्या ओघात वारीच्या स्वरूपात निश्चित बद्दल झाले असतील, मात्र वारीचा सेवाभाव शेकडो वर्ष कायम आहे.समाजात सत्य, सदाचार, प्रेम, शांती आणि सेवाधर्माचे आचरण दिंडीत सहभागी वारकऱ्यांमध्ये पाहायला मिळतात. कोणतेही लिखित नियमांशिवाय गेली अनेक वर्ष नियमबद्ध पद्धतीने सुरू असलेला दिंडी सोहळा हा महाराष्ट्र अनुभवतो आहे.

असेही ते यावेळी म्हणाले.मार्गदर्शन करताना जैतमहल म्हणाले की, वारकरी हा महाराष्ट्राच्या सामाजिक आणि सांस्कृतिक जीवनातील शिस्त व संयम अंगी बाळगलेला नागरिक असतो. डोक्यावर कुठल्याही शास्त्राचे व पंडित त्याचे ओझे न बाळगता अत्यंत साधेपणातून ईश्वराची भक्ती व शाश्वत समाधान प्राप्त करण्यासाठी वारकऱ्याने आषाढी वारीची प्रथा कायम ठेवली आहे.पुढे बोलताना कोरे म्हणाले की, महाराष्ट्रातील फडकऱ्यांची परंपरा आणि दिंडीचा वारसा हा महाराष्ट्राच्या सामाजिक आणि सांस्कृतिक जीवनातील अमूल्य असा ठेवा आहे. या दिंडीच्या निमित्ताने हा ठेवा पुढच्या पिढीकडे हस्तांतरित करण्याचे काम हभप सोनुने गुरुजी करीत आहेत गुरुजी करीत आहेत. आज या दिंडीत २५० च्या सुमारास वारकरी सहभागी झालेले आहेत. या वारकऱ्यांना अतिशय खडतर परिस्थितीत देखील मूल्यांशी तडजोड न करण्याचा आदर्श गुरुजींनी घालून दिलेला आहे. हा आदर्श निश्चितपणे अनुकरणीय असल्याचे प्रा.कोरे म्हणाले.अध्यक्षीय समारोप प्रसंगी बोलताना गुप्ता म्हणाले की, पंढरीचा विठ्ठल हा तुमचा, आमचा सर्वांचा पाठीराखा आहे.

वारीच्या रूपाने साक्षात पांडुरंग आम्हाला दर्शन देण्यासाठी आला आहे. दरवर्षी हा दर्शनाचा योग लाभावा अशी अपेक्षाही त्यांनी यावेळी व्यक्त केली. विशेष उपस्थिती म्हणून मनोगत व्यक्त करताना प्राचार्य डॉ.अग्निहोत्री म्हणाले की, वारीत सहभागी प्रत्येक वारकरी हे विठ्ठलाचे एक रूप आहे. ज्यांना प्रत्यक्ष वारीत सहभागी होता येत नाही, त्यांनी वारीतील वारकऱ्यांची सेवा केली तरी वारीचे पुण्य मिळते. पुढे प्राचार्य डॉ.एस.डी.तळेकर यांनी महाविद्यालयाच्या वतीने सर्व वारकऱ्यांचे व उपस्थित श्रोत्यांचे स्वागत करून महाविद्यालयाविषयी थोडक्यात आढावा मांडला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. वासुदेव उगले यांनी तर सूत्रसंचालन ग्रंथपाल प्रा.राहुल अंभोरे यांनी केले. या कार्यक्रमासाठी २५० दिंडीतील सहभागी वारकरी व शहरातील ६० ते ७० नागरिकांची उपस्थिती होती.

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

## पाऊस

पाऊस कुठेही पडतो
असा तसा नको नकोसा
हवाहवासा वाटणारा...
पाऊस,
नवा आशावाद घेवून येणारा
जगण्याचे सोहळे सजवणारा
माणूसकी आणि क्रौरतेचे दर्शन
घडविणारा ...
पाऊस,
देखना सतेज नयनरम्य
आठवणींचा साठवणींचा ही
असतो पाऊस...
पाऊस,
रात्र रात्र जागवणारा, कधी कधी होतंचं नव्हतं करणारा
आक्राळ विक्राळ पाऊस....
पाऊस,
दो जिवाचा साथी
पाऊस आणाभाका करणारा
धोका देणारा ही असतो पाऊस
कधी कधी...पाऊस,
मन मोहन आनंदाचा सृजन सोहळा, रानातल्या सौंदर्याचा
मोर पिसारा असतो पाऊस..
पाऊस,
बेभान, धुव्वाधार, बेफाम
नदी नाले एक करणारा
तर कधी कधी नुसताच
कोरडा असतो पाऊस...
पाऊस,
तरसणारा, असणारा , नसणारा,
आणि अचानक ढगातून उगवणारा पाऊस...
पाऊस, विकत घेतलेला, विकलेला
हरवलेला ही असतो पाऊस...
पाऊस,
विविध रूपात, नटून थटून
सजून धजून रंगबिलोरी
थयथय नाचत आकंड तांडव
करणारा ही असतोच पाऊस
पाऊस,
सखा, साजन,मोर मनमोर
घनघोर असतो पाऊस...
पाऊस,
घरात,दारात ,रानात
कुठेही पडतच असतो
तो कुणाला हवा हवासा
असतो तर कुणाला नकोसा ही
पाऊस,
आनंददायी सृष्टीचा सृजन सोहळा
मनभावन असतो पाऊस....
पाऊस,
ही केवळ पहायची गोष्ट नाही
छत्रीतून मिरवण्याची तर नाहीच नाही.
पाऊस,
भिजल्या मातीचा
नात्या गोत्याचा
म्हाताऱ्या कोताऱ्याचाही
असतो पाऊस...
पाऊस
आपल्या सर्वांचा
सर्वांसाठी खूप काही देणारा
असतो पाऊस...
फक्त मनात साठवता आला पाहिजे पाऊस....
कधी कधी डोळ्याच्या पापणीतून
भर उन्हाळ्यात ही टपकत असतो पाऊस...

**कवि - डॉ. शिवाजी हुसे**
**कन्नड**

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार 27 जून 2025


## मनपा कें.प्रा.शा. मुकुंदवाडी शाळेत राजर्षी शाहू महाराज यांच्या जयंती साजरी



**छत्रपती संभाजीनगर :** मनपा कें.प्रा.शा. मुकुंदवाडी शाळेत महिला शिक्षिकांच्या अध्यक्षेतेखाली राजश्री शाहू महाराज यांच्या जयंती दिना निमित्य त्यांच्या प्रतिमेस अभिवादन करण्यात आले.

या प्रसंगी श्री सचिन गायकवाड यांनी बहुजनांना त्यांचे न्याय्य हक्क मिळवून देणारे थोर समाजक्रांतिकारी राजे, विद्यार्थी वसतिगृहाचे प्रणेते, भारतीय आरक्षणाचे जनक राजश्री शाहू महाराज यांच्या कार्याबद्दल विद्यार्थ्यांना माहिती दिली.

या कार्यक्रमास शाळेचे मुख्याध्यापक श्री के.बी. चौधरी, श्री सुभाष खिल्लारे, श्रीमती अर्चना पंडित, श्रीमती हर्षाली वानखेडे, श्रीमती अंजली चिंचोलीकर, श्रीमती मंगल पवार, श्रीमती मंगल निकम, श्रीमती मयुरी इंगळे, श्रीमती विशाखा रेवणवार उपस्थित होते.

## जे.ई.एस. महाविद्यालय जालना येथे राजर्षी शाहू महाराज यांची जयंती साजरी



**जालना (प्रा. डॉ. राजेंद्र सोनवणे):** जे ई एस महाविद्यालय जालना येथे राजश्री शाहू महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी उपप्राचार्य प्रा. प्रवीण बाफना, पर्यवेक्षक प्रा सुमंत बिक्कड, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ राजेंद्र सोनवणे. प्रा महेश सोनी, आदि उपस्थित होते.









## केंद्रीय प्राथमिक शाळा मुकुंदवाडी शाळेतील विद्यार्थ्यांनी रायफल शूटिंग विभागीय स्पर्धेमध्ये यश संपादन







**छत्रपती संभाजीनगर :** केंद्रीय प्राथमिक शाळा मुकुंदवाडी शाळेतील विद्यार्थ्यांनी रायफल शूटिंग विभागीय स्पर्धेमध्ये यश संपादन केल्यामुळे रोटरी क्लब औरंगाबाद, छत्रपती संभाजीनगर यांच्यामार्फत विद्यार्थ्यांना सरावासाठी रायफलच्या पॅलेट्स ( गोळ्या ) प्रदान करण्यात आल्या. याप्रसंगी शिक्षणाधिकारी मा. श्री. भारत तीनगोटे साहेब, विस्तार अधिकारी श्री. रामनाथ थोरे साहेब, रोटरी क्लब औरंगाबाद चे अध्यक्ष रोटरीयन मा. श्री श्रीपाद कुलकर्णी, शाळेचे मुख्याध्यापक श्री के. बी. चौधरी, क्रीडा प्रशिक्षक सय्यद इरफान, रोटरी समन्वयक श्रीमती वर्षा बरसाले, श्री सचिन गायकवाड,, श्री सुभाष खिल्लारे, श्रीमती अर्चना पंडित, श्रीमती हर्षली वानखेडे, श्रीमती शिल्पा मालोदे, व सर्व शिक्षक उपस्थित होते.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार 27 जून 2025


## सिद्धार्थ महाविद्यालयात छत्रपती राजर्षी शाहू महाराज जयंती उत्साहात संपन्न



**छत्रपती संभाजीनगर (प्रा. शिवाजी गायकवाड) :** सिद्धार्थ ग्रंथालय व माहितीशास्त्र महाविद्यालय पडेगाव येथे छत्रपती शाहू महाराज जयंती मोठ्या उत्साहात संपन्न झाली. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. प्रवीण कुमार व डॉ. ज्योती बासू उपस्थित होते .तसेच संस्थेचे संचालक प्रा. सुनील मगरे व इंजी. साहिल मगरे यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी प्रवीण कुमार यांनी शाहू महाराजांच्या शिक्षण विषयक व शेती विषयक धोरणाविषयी सविस्तर माहिती दिली. प्रा. सुनील मगरे म्हणाले, छत्रपती राजश्री शाहू महाराज हे बहुजन समाजाचे महानायक, शेतकऱ्यांचा उद्धार करता, दूरदृष्टीचा विशाल मनाचा राजा व एक लोकनेते होते त्यांनी समाजातील बहुजन मागासलेल्या तळागाळातील वर्गाला समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्याकरिता जे अनेक कार्य केले त्यात गुन्हेगारी जमातीवरील गुन्हेगारीचा शिक्का बंद केला. मुलांच्या सक्तीच्या शिक्षणासाठी पालकांना दंड केला ,सहकारी तत्त्वाची भावना लोकांमध्ये रुजवली जनहितार्थ कायद्याची मांडणी केली, अंतर्जातीय विवाहाला प्रोत्साहन दिले.

विधवा पुनर्विवाह कायदा आणला, अशा प्रकारे शाहू महाराजांनी लोकांसाठी लोकांचे राज्य रुजवण्याचा प्रयत्न केला .अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ. मनोहर वानखेडे म्हणाले ,शाहू महाराज हे कोल्हापूर संस्थानचे छत्रपती होते. बहुजनांचा आधार, थोर लोकराजा होता. शाहू महाराजांचा जन्म १६ जून १८७४ रोजी कागल येथील घाडगे घराण्यात झाला.

त्यांचे मूळ नाव यशवंत आणि आईचे नाव राधाबाई व वडिलांचे नाव जयसिंगराव घाटगे असे होते . पुढे चौथे शिवाजी महाराज यांच्या पत्नी आनंदीबाई यांनी यशवंताला दत्तक घेतले व त्यांचे नाव नव्याने शाहू असे ठेवले. राजश्री शाहू महाराजांनी समाजाला शिक्षणाशिवाय पर्याय नाही असा संदेश दिला .त्यांनी शिक्षण ,कृषी, उद्योग, कला, क्रीडा इत्यादी क्षेत्रात लोक कल्याणकारी कार्य केले.

या कार्यक्रमाचे संचालन प्रा. कुलदीप जाधव यांनी केले. तर आभार प्रा. सुनील बत्तीशे यांनी केले . या प्रा दीपक पाईकराव, डॉ मिलिंद आठवले, प्रा विनोद अंभोरे, डॉ शेख खालेद, प्रा रोहिणी देवकाते इत्यादींनी परिश्रम घेतले. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील शिक्षक विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.






## महिला महाविद्यालयात नशामुक्ती शपथ




**छत्रपती संभाजीनगर (डॉ. प्रतिभा धोंडकर) :** डॉ. (सौ.) इंदिराबाई भास्करराव पाठक महिला कला महाविद्यालयात नशामुक्ती शपथ कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाचे आयोजन राष्ट्रीय सेवा योजना समितीद्वारे करण्यात आले होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. मीनल श्रीगिरीवार यांनी केले. महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. सुनिता बाजपाई यांनी विद्यार्थ्यांना नशेच्या दुष्परिणामांविषयी जागरूक केले व त्यापासून दूर राहण्याचे महत्त्व अधोरेखित केले.यानंतर उपस्थित सर्व प्राध्यापक, विद्यार्थी, शिक्षकेतर कर्मचारी यांनी एकत्र येऊन नशामुक्तीची शपथ घेतली. शपथ वाचन राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. अन्विता अग्रवाल यांनी केले. सर्वांनी शपथ घेतली की, "मी कधीही कोणत्याही प्रकारचे व्यसन करणार नाही. मी व्यसनमुक्त समाजासाठी कार्य करीन आणि इतरांनाही व्यसनमुक्त राहण्यासाठी प्रोत्साहित करीन. व्यसनमुक्त भारत घडवण्यासाठी मी सदैव कटिबद्ध राहीन."

## बीडच्या शिक्षणाधिकारी प्रियाराणी पाटील यांचे प्राचार्य केशव भांगे यांनी स्वागत केले



**शिरूर का. :** छत्रपती संभाजीनगर येथील माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळात, 'सहसचिव' या पदावर कार्यरत असणाऱ्या मा.प्रियाराणी पाटील मॅडम यांची नियुक्ती बीड येथे जिल्हा परिषद शिक्षण विभागाच्या माध्यमिक शिक्षणाधिकारी या पदावर करण्यात आली आहे.

प्रियाराणी पाटील मॅडमने रूजू होऊन नुक्ताच पदभार हाती घेतला असता, शिरूर (कासार) येथील कालिकादेवी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे मुख्याद्यापक तथा प्राचार्य केशव भांगे साहेब यांनी मा.प्रियाराणी पाटील मॅडमचे शाल, श्रीफळ व बुक्के देऊन स्वागत केले आहे. आणि पुढील कार्यासाठी मन:पूर्वक शुभेच्छा दिल्या आहेत.

बीडच्या शिक्षण विभागात एक महिला अधिकाऱ्यांची शिक्षणाधिकारी म्हणून निवड झाली, या विषयी समाधान व्यक्त करून पाटील मॅडमच्या कार्याला नवी प्रेरणा,ऊर्जा व दिशा मिळावी अशी सदिच्छा ही व्यक्त केली.

त्यानंतर शासणाच्या नवीन शिक्षण विषयक धोरणावर विद्यायक दृष्टिकोनातून चर्चा केली असता ; बीडच्या शिक्षण विभागाला एक नंबरचे मानांकन मिळावे यासाठी सर्वजन मिळून एक दिलाने काम करूया, असा आशावाद पाटील मॅडमने यावेळी व्यक्त केला आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार 27 जून 2025


## बद्रीनारायण बारवाले महविद्यालयात राजर्षी शाहूना अभिवादन !!!




**जालना:** राजर्षी शाहू महाराजांनी केलेल्या सुधारणामुळे कोल्हापूर संस्थानाने मोठी प्रगती केली. राजर्षी शाहू च्या सामाजिक न्यायाच्या धोरणामुळे सर्व जाती जमातींना विकासाची संधी मिळाली. राजर्षी शाहू यांनी सामाजिक विषमतेला तिलांजली दिली.

त्यांनी कोल्हापूर संस्थानात विविध प्रकारच्या सुधारणा करून संस्थान पुढे नेण्याचा प्रयत्न केला. विकासाच्या बाहेर असलेल्या अनेक जाती जमातींना त्यांनी प्रशासनामध्ये महत्त्वाच्या जागी नेमून त्यांचा आत्मविश्वास वाढविला. त्यांच्यासारखा व्हिजनरी राजा कुठेही दिसून येणार नाही. प्रत्येक व्यक्तीच्या अंगी असणाऱ्या गुणांची पारख करून त्याला त्याची जाणीव करून देण्याचे राजर्षी शाहू महाराजांचे कौश्यले वाखाणण्यासारखे होते.

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांमधील बौद्धिक आणि नेतृत्व गुण त्यांनी ओळखले होते. त्यांच्या प्रत्येक कार्यात पाठबळ देण्याचे काम राजर्षी शाहूंनी केले. शिक्षण, उद्योग, कला, संगीत, पाणी आणि शेत जमीन सुधारणा, क्रीडा क्षेत्र यासह विविध क्षेत्रात त्यांनी मोठे योगदान दिले आहे. अगदी कमी कालखंडात त्यांनी हिमालया एवढे कार्य केले आहे.

गोरगरीब वंचित समाजाला त्यांनी खऱ्या अर्थाने मोठे बनविण्याचा प्रयत्न केला. असे प्रतिपादन प्रा. राजक्रांती वलसे यांनी केले. बद्रीनारायण बारवाले महाविद्यालयात आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.पुढे ते म्हणाले, वर्तमान परिस्थितीत मात्र राजर्षी शाहूंच्या विचाराचा विसर सर्वांनाच पडलेला दिसून येतो. प्राथमिक ते उच्च शिक्षण प्रचंड महाग होत आहे.

भविष्यात गोर गरिबांची मुले शिकतील की नाही याची खात्री नाही. विविध प्रकारच्या कल्याणकारी कार्यक्रमातून शासन काढता पाय घेत आहे. निवडणुका जिंकणे हेच त्यांचे काम आहे. आपल्या जबाबदारीतून ते मुक्त होत आहे. सर्वसामान्यांच्या कल्याणाचे त्यांना काहीही सोयर सुतक नाही. भ्रष्टाचार, शोषण, अन्याय-अत्याचार, गुन्हेगारी मोठ्या प्रमाणात वाढले आहे. सर्वसामान्यांना लुबाडण्याचे, फसवण्याचे काम होत आहे. अतिशय निराशाजनक परिस्थिती सध्या दिसून येते. म्हणून राजर्षी शाहूच्या विचाराचे खरे पाईक बनण्याची आज गरज आहे.प्रारंभी प्राचार्य कविता प्राशर यांच्या हस्ते राजर्षी शाहू महाराजांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला.

सूत्रसंचालन प्रा. डॉ.प्रियदर्शन भवरे यांनी केले. यावेळी राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी डॉ. उद्धव थोरवे, डॉ. क्षमा अनभुले यांच्यासह प्रा. सुरेश कागणे, डॉ. भूषण नाफडे, प्रा. प्रवीण कोकणे, डॉ. कालिदास सूर्यवंशी, प्रा. शशिकांत चौधरी, प्रा. संभाजी कांबळे, प्रा. विलास भुतेकर, डॉ. रवींद्र भोरे, डॉ. निशिकांत लोखंडे, प्रा. देशमुख, डॉ. व्यंकटेश कोरेबोइनवाड, प्रा. राहुल वाकडे, विजय लोणकर, अजय जोशी, वर्षा जोशी, ज्योती धांडे, वसंत नरवडे, शिवाजी जोशी, सुरेश खरात, चरण पाटील यांच्यासह शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

## देवेंद्र फडणवीस यांच्या धमकीमुळे आमची झोप उडाली : शरद पवार

**पुणे** : महाराष्ट्रातील महायुती सरकारचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प म्हणजे नागपूर ते गोवा असा शक्तिपीठ महामार्ग. परंतु या महामार्गाला कोल्हापूर, धाराशिव आणि सोलापूर या जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी तीव्र विरोध दर्शवला आहे. मंत्रिमंडळाच्या बैठकीत या प्रकल्पाच्या भूसंसंपादनाच्या दृष्टीने २० हजार कोटी रुपयांच्या तरतुदीस मंजूरी देण्यात आली आहे. तसेच या प्रकल्पात राजकारण आणाल तर याद राखा, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी इशारा दिला आहे. यावर शरद पवारांनी खोचक टोला लगावला आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शक्तिपीठ महामार्गात राजकारण आणाल तर याद राखा, असा इशारा विरोधकांना दिला आहे. यावर प्रतिक्रिया देताना राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार गटाचे अध्यक्ष शरद पवार यांनी खोचक टोला लगावला आहे. ते म्हणाले, शक्तिपीठ महामार्गाचा विषय मला समजून घ्यायचा आहे. कोल्हापूरच्या लोकांबरोबर मी बोलणार आहे. त्यानंतर राज्य सरकारने आम्हा लोकांना त्याची माहिती देण्याची तयारी दाखवली तर तेही समजून घेण्याचा माझा विचार आहे. देवेंद्र फडणवीसांच्या धमकीमुळे आमची झोप उडाली आहे, आता आमचे कसे होणार? असा खोचक टोला लगावला आहे.

पुढे बोलताना शरद पवार म्हणाले, हा प्रकल्प काय आहे? हे आधी मी समजून घेईन. त्याची आवश्यकता आहे का? ते समजून घेईन. त्यासाठी सरकारने आम्हाला माहिती दिली तर ती देखील मी घेणार आहे. त्या भागातला शेतकऱ्यांच्या जमिनी घेतल्या जातात, त्या भागातले लोकप्रतिनिधी जे जाहीर बोलत आहेत त्यांची मते आणि त्यांचा आग्रह हा समजून घ्यावा लागेल. मी कधीच विरोधासाठी विरोध करणार नाही, असेही शरद पवारांनी स्पष्ट केले.

## राज्यात हिंदीची नव्हे केवळ मराठीची सक्ती : आशिष शेलार



**मुंबई** : मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी राज्यातील हिंदीच्या सक्तीविरोधात ५ जुलै रोजी मुंबईत मोर्चा काढण्याची हाक दिली आहे. भाजप नेते तथा राज्याचे कॅबिनेट मंत्री आशिष शेलार यांनी या प्रकरणी सरकारची भूमिका स्पष्ट करत राज्यात हिंदीचे नव्हे तर केवळ मराठीची सक्ती असल्याचे स्पष्ट केले. राज्यात हिंदीची सक्ती असा शब्द वारंवार वापरला जातो. पण राज्यात प्राथमिक शिक्षणात केवळ हिंदी भाषेची सक्ती आहे. इतर कोणत्याही भाषेची नाही, असे ते म्हणालेत.

आशिष शेलार म्हणाले, राज्यात हिंदी भाषेची सक्ती नाही. राज्यातील शिक्षणात हिंदीची सक्ती ही भाजपची भूमिका नाही. पर्यायी भाषा म्हणून विद्यार्थ्यांच्या इच्छेसाठी जेवढ्या भाषा आहेत, त्यात हिंदी असावी असे आमचे मत ग्रआहे. हिंदी ऐच्छिक भाषेत असायला हवी असे आम्हाला वाटते. त्यामुळे याचा कुणी विपर्यास केला असेल, कुणाचा गैरसमज झाला असेल तर त्यांनी तो दूर करावा. या प्रकरणी भाजपची भूमिका व राज्य शासनाच्या शैक्षणिक धोरणात अतिशय स्पष्टता आहे. आम्ही मराठी भाषेच्या मुद्यावर कट्टर आहोत, पण विद्यार्थी हिताचेही तेवढेच खंदे समर्थक आहोत.

ते पुढे म्हणाले, राज्यातील प्राथमिक शिक्षणात केवळ मराठीची सक्ती आहे. इतर कोणत्याही भाषेची सक्ती नाही. आम्ही मराठी सक्ती व समर्थन करतो. राज्यात हिंदीची सक्ती आहे का? तर याचे उत्तर नाही असे आहे. पण काही जे लोक हिंदीविषयी गैरसमज पसरवत आहेत, हिंदी भाषा व भाजप असे राजकीय वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न करत आहेत त्यांना एक सांगतो की, त्यांच्याच सरकारने यापूर्वी पाचवी, सहावी व सातवीला हिंदीची सक्ती केली होती. ती भाजप सरकारच्या निर्णयामुळेच हटली. आम्ही हिंदी भाषा सक्ती म्हणून नव्हे तर ऐच्छिक व पर्यायी भाषा म्हणून ठेवली. पाचवी, सहावी, सातवीत हिंदीची सक्ती होती ती आता भाजपामुळेच नाही इतके स्पष्ट सत्य आहे, असे ते म्हणाले.

राज्य सरकारने फेब्रुवारी २०२२ मध्ये राष्ट्रीय शिक्षण धोरणाचा (एनईपी) स्वीकार केला. त्याचे प्रशासकीय काम सुरू झाले. त्यावेळी त्रिभाषा सूत्र वापरले गेले. तेव्हा उद्धव ठाकरे स्वतः मुख्यमंत्री होते. त्यांनी मराठीवर आग्रही रहावे. ते आग्रही राहिले नाही, तर भाजप तसा आग्रह धरेल. पण त्रिभाषा सूत्रासंबंधीच्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची कारवाई २०२२ मध्ये उद्धव ठाकरे सरकारच्या काळातच झाली, असे आशिष शेलार म्हणाले.

विरोधक या प्रकरणी त्रिभाषा सूत्र व हिंदीचा पर्याय या दोन्ही गोष्टी एकत्रित करून संभ्रम पसवरत आहेत. सरकारने विद्यार्थ्यांच्या हितासाठी त्रिभाषा सूत्र आणले. मराठी मुले शिकणाऱ्या अनेक शाळांचे माध्यम इतर भाषांचे आहे. या कित्येक वर्षांपासून सुरू आहेत. सरकारने २०२० मध्ये कायदा करून या शाळांमध्ये मराठी अनिवार्य केली. त्यामुळे आज तिथे मराठी शिकवली जात आहे. या निर्णयामुळे या शाळांमधील विद्यार्थ्यांना मराठीसह इतर २ भाषा शिकता येत आहे. त्यामुळे त्रिभाषा शिकणे अवघड आहे असे म्हणणे योग्य नाही, असेही आशिष शेलार या प्रकरणी बोलताना म्हणाले.